महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मंबई ● ठाणे ● रायगड ● पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक – रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

मंगळवार ❖ २१ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - २०७ ❖ पाने - ४ ❖ RNI NO : MAHMAR/2016/72091 ❖ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# बायोगॅस प्रकल्पाला घोटाळ्याची दुर्गंधी

## बारा वर्षात शून्य वीजनिर्मिती ?

दैनिक ठाणे जीवनदीप मधून बाहेर येणार बदलापुर नगरपालिकेतील अनेक घोटाळे !



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

बदलापूर: कुलगाव-बदलापूर नगरपरिषदेकडून २०१२ साली सुरू करण्यात आलेल्या बायोगॅस प्रकल्पासाठी ७८ लाख रुपये खर्च केले गेले. परंतु, मागील १२ वर्षांत या प्रकल्पातून एकही युनिट वीज निर्मिती झालेली नाही. हा प्रकल्प केवळ कागदावरच असल्याचा आरोप माजी नगरसेवक संभाजी शिंदे यांनी केला आहे. त्यांनी या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला असून, संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

**प्रकल्पाची पार्श्वभूमी आणि उद्देश:**

२०१२ मध्ये बदलापूर-कुलगाव नगरपरिषदेने ओल्या कचऱ्याचा उपयोग करून बायोगॅस निर्मितीचा उपक्रम सुरू करण्यासाठी ७८ लाख रुपये मंजूर केले होते. यामधून तयार होणाऱ्या बायोगॅसचा उपयोग वीज निर्मितीसाठी केला जाणार होता. प्रकल्पाचा उद्देश शहरातील कचऱ्याचा योग्य वापर करून स्वच्छता राखणे आणि वीज निर्मितीच्या खर्चात बचत करणे हा होता.

**स्थलदर्शन अहवालातील धक्कादायक निष्कर्ष:**

नगरपरिषदेसाठी तयार करण्यात आलेल्या प्रकल्पाचे बहुतेक यंत्र खराब स्थितीत सापडले. २०१२ नंतर दरवर्षी प्रकल्पासाठी अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला, परंतु याचा प्रत्यक्ष उपयोग झाला नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

याशिवाय, बायोगॅसद्वारे वीज निर्मिती केवळ कागदोपत्री असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**संभाजी शिंदे यांचा आरोप:**

माजी नगरसेवक संभाजी शिंदे यांनी नगरपरिषदेतील अधिकाऱ्यांवर आणि सत्ताधारी गटावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. "या प्रकल्पासाठी मंजूर झालेला निधी थेट पुरवठादार कंपनीकडे वर्ग केला गेला. परंतु प्रत्यक्षात प्रकल्प उभारणीत कोणतीही प्रगती झाली नाही. हा ७८ लाख रुपयांचा निधी वाया घालवण्याचा कट आहे," असे त्यांनी म्हटले आहे.

**पुन्हा सुरू करण्याच्या नावाखाली अपव्यय:**

प्रत्येक आर्थिक वर्षात या प्रकल्पासाठी अतिरिक्त निधी मंजूर केला जात आहे. उदाहरणार्थ, २०१९-२० मध्ये ९ लाख, २०२०-२१ मध्ये १० लाख आणि २०२१-२२ मध्ये ११.९६ लाख रुपयांची तरतूद केली गेली. परंतु, त्यानंतरही प्रकल्प कार्यरत झाल्याचे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत. संभाजी शिंदे यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर आणि ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. "सत्ताधारी गटाने हे प्रकरण दडपून ठेवले. बायोगॅस प्रकल्पाचा उपयोग वीज निर्मिती किंवा शहराच्या स्वच्छतेसाठी होण्याऐवजी तो भ्रष्टाचाराचा नमुना ठरला आहे," असे शिंदे म्हणाले.

**राजकीय वातावरण तापले:**

या घोटाळ्यामुळे बदलापूर परिसरात राजकीय वातावरण तापले आहे. नगरपरिषदेतील सत्ताधारी गटाने या प्रकरणाबाबत मौन पाळले आहे, तर विरोधी गट या प्रकरणाचा वापर करून भ्रष्टाचार उघड करण्याचा प्रयत्न करत आहे.

**गैरव्यवहार आणि दोषी कंपनीची भूमिका:**

माजी नगरसेवक संभाजी शिंदे यांनी सांगितले की, ७० लाख रुपयांचा निधी थेट पुरवठादार कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आला, मात्र संबंधित कंपनीने काम अर्धवट सोडले. या प्रकल्पासाठी यंत्रणा उभी करण्यात आली असली तरी त्याचा पूर्ण क्षमतेने वापर कधीच झाला नाही. प्रकल्पासाठी लागणाऱ्या महत्त्वाच्या यंत्रणांची उभारणी झालेली नसल्याने, हा प्रकल्प निकामी ठरला. १५ मार्च २०२१ रोजी झालेल्या स्थळ पाहणी अहवालात बायोगॅस यंत्रणा निकामी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.


# पाचशे किमी पर्यंत नॉनस्टॉप ई बस प्रवास शक्य !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पारंपारिक डिझेल बसेसना इलेक्ट्रिक बसेसचा पर्याय दिल्यास जिवाश्म इंधनावरचा ( डिझेल ) भारताचा खर्च वाचणार आहे. भारताची इंधनाची आयात कमी झाल्याने परकिय चलन वाचू शकते. बरोबरीनेच ऑपरेशनल खर्च कमी आणि शहरातील हवेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारली जाऊ शकते. इलेक्ट्रिक टिपर्सच्या क्षेत्रातही कंपनीने आपले पाय रोवल्याचे म्हटले आहे.

मुंबई ते पुणे, नाशिक तर रत्नागिरी आणि धुळ्यापर्यंतचा नॉनस्टॉप प्रवास शक्य, नवी 500 km रेंजची इलेक्ट्रीक बस दाखल

राजधानी दिल्लीत सुरू असलेल्या 'भारत मोबिलिटी ग्लोबल ऑटो एक्स्पो' मध्ये नव्या मोटारी आणि प्रवासी वाहनांची नवीन मॉर्डल प्रदर्शित झाली आहेत . ऑलेक्ट्रा ग्रिनटेक लिमीटेड (OGL) कंपनीने आपली नव्या पिढीच्या 'इलेक्ट्रिक बस' या मेळयात लाँच केल्या आहेत. एकदा चार्ज केल्यावर या बसेस थोडेथोडके नव्हे चक्क 500 किलोमीटर्स धावणार आहेत. म्हणजेच मुंबईतून केवळ पुणेच नव्हेच तर नाशिक, थेट छत्रपती संभाजीनगर , अहिल्यादेवी नगर , कोकणाती थेट सांवतवाडीपर्यंत ही बस एका




चार्जिंगमध्ये प्रवास करु शकणार आहे. ओलेक्ट्राने नव्याने डिझाईन केलेल्या १२-मीटर ब्लेड बॅटरी प्लॅटफॉर्म आणि नवीन शैलीतील ९ – मीटर सिटी आणि ब्लेड बॅटरीने सुसज्ज अशी १२-मीटर कोच बसेस अशी नवी उत्पादने दिल्लीतील प्रदर्शनात सादर केली आहेत. महाराष्ट्रासाठी याचे महत्व अशासाठी की ऑलेक्ट्राला महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला इलेक्ट्रिक बसेस पुरवण्याचे कंत्राट मिळाले आहे. इ- शिवाई आणि शिवनेरी बरोबरच ९ मीटरच्या छोट्या बसेस देखील टप्प्या टप्प्याने एसटी महामंडळाला दर महिन्याला टप्प्या टप्प्याने ऑलेक्ट्राकडून पुरविला जात आहे. ब्लेड बॅटरीमध्ये 30 % अधिक ऊर्जा साठवणूक क्षमता आहे, ज्यामुळे या बसेस एका चार्जिंगवर 500 किलोमीटरपर्यंतचा प्रवास बिनदिक्कतपणे करू शकतात. ही बस अधिक जागा वाचवते आणि तुलनेने हलकी आहे. 5000 पेक्षा जास्त चार्ज सायकलचे आयुष्य असणारी ही बॅटरी इलेक्ट्रिक वाहनांसाठी आगामी काळात जास्त टिकाऊ आणि विश्वासार्ह पर्याय ठरू शकते. कंपनीने दावा केल्या प्रमाणे आंतराष्ट्रीय मानकांच्या अत्यंत कठोर चाचण्या कोणत्याही आग स्फोटासारखे अपघात न होता या बॅटरीजने पार केलेल्या आहेत.अॅडव्हान्स्ड ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टीम्स (ADAS), GPS ट्रॅकिंग आणि CCTV कॅमेरे यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे उत्तम सुरक्षा उपाययोजना या बसेसमध्ये आहेत.

### दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ

# रायगडचे पालकमंत्रिपद भाजपकडे ?



रायगड पालकमंत्री पदावरून शिंदे गट आणि राष्ट्रवादीत वाद
महाविकास आघाडी सरकारच्या काळात रायगडचे पालकमंत्री राहिलेल्या राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे यांना पुन्हा या पदाची संधी मिळणार असल्याचे स्पष्ट होताच रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्या समर्थकांनी संताप व्यक्त केला. या नाराजीच्या पार्श्वभूमीवर महामार्ग रोखून आंदोलन झाले. तर दुसरीकडे तटकरे यांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला, ज्यामुळे हा वाद आणखी पेटला.

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १८ जानेवारी रोजी ३६ जिल्ह्यांसाठी पालकमंत्री व सहपालकमंत्री यांची नियुक्ती केली. मात्र, रायगडच्या पालकमंत्री पदावरून शिंदे गटातील रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्या समर्थकांनी तीव्र विरोध दर्शविला. त्यांनी मुंबई-पुणे महामार्गावरील आंदोलनादरम्यान टायर जाळून निषेध नोंदविला. परिणामी, रायगड पालकमंत्री पदाच्या नियुक्तीवर तूर्त स्थगिती देण्यात आली असून, भाजपाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना हे पद दिले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**महायुतीत मंत्री पद वाटपावर नाराजीचे सूर**

राज्यात भाजपाला स्पष्ट बहुमत मिळूनही राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांना सामावून घेत महायुतीचे सरकार स्थापन झाले. मात्र, खातेवाटपावरून शिंदे गटातील नाराजी वाढली. याच पार्श्वभूमीवर रायगडच्या पालकमंत्री पदाच्या नियुक्तीवरून पुन्हा वाद निर्माण झाला आहे.

**मुख्यमंत्र्यांनी घेतली हस्तक्षेपाची भूमिका**

या वादाला तोंड देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी रायगडसह नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाच्या नियुक्तींवर तात्पुरती स्थगिती दिली. राजकीय सूत्रांनुसार, या वादावर तोडगा काढण्यासाठी रायगडचे पालकमंत्री पद भाजपाच्या माधुरी मिसाळ यांच्याकडे सोपवले जाणार आहे.

**रायगड वादाच्या पार्श्वभूमीवर भाजपाचा तोडगा?**

शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटातील वाद निवळण्याऐवजी वाढत असल्याने, मुख्यमंत्र्यांनी तिसऱ्या व्यक्तीला रायगडचे पालकमंत्री करण्याचा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे. पुण्याच्या पर्वती विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या माधुरी मिसाळ यांना प्रशासनाचा चांगला अनुभव असून, रायगडच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी त्यांना दिल्यास भाजपाला देखील राजकीय फायदा होणार आहे.



# उद्धव ठाकरे-शरद पवार यांची भेट आघाडीत सारं काही आलबेल !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची सोमवारी भेट घेतली. दीड तासांच्या या भेटीत स्थानिक स्वराज्य संस्थांतील आघाडी तसेच सद्यस्थितीतील राजकारणावर उभयतांमध्ये चर्चा झाली. आगामी महानगरपालिका, नगरपालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा शिवसेनेने केल्याने महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पवार आणि ठाकरे यांच्यात झालेली चर्चा महत्त्वाची ठरते.

उद्धव ठाकरे, शरद पवार भेटीदरम्यान अनेक राजकीय विषयांवर चर्चा झाली असली तरी ही चर्चा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत नव्हती, असे शिवसेना नेते संजय राऊत यांनी स्पष्ट केले. स्थानिक निवडणुकांबाबत काँग्रेस नेत्यांची काय भूमिका आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या संदर्भात महाविकास आघाडीची बैठक लवकरच आयोजित केली जाईल. त्यात निर्णय घेतला जाईल, असे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटल यांनी सांगितले.

# दिनेश वाघमारे राज्याचे निवडणूक आयुक्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जेष्ठ सनदी अधिकारी दिनेश वाघमारे यांची राज्याचे नवीन निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या नावाची शिफारस राज्यपालांकडे केल्यानंतर राज्यपालांनी त्यावर शिक्कामोर्तब केलं आहे. राज्यातील महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी नवीन निवडणूक आयुक्तांवर असणार आहे. दिनेश वाघमारे हे सचिव दर्जाचे अधिकारी आहेत. मंत्रिपरिषदेने नव्या निवडणूक आयुक्तांची निवड करण्याचे सर्वाधिकार हे मुख्यमंत्र्यांना दिले होते. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी दिनेश वाघमारे यांच्या नावाची



शिफारस केली होती. त्यानुसार राज्यपालांची दिनेश वाघमारेंच्या नावाला मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर राज्य सरकारच्या वतीने वाघमारेंच्या नियुक्तीचा एक आदेश जाहीर करण्यात आला आहे. दिनेश वाघमारे हे पुढच्या पाच वर्षांसाठी राज्याचे निवडणूक आयुक्त असतील. श्री. दिनेश टी. वाघमारे हे सदर पदाचा कार्यभार स्वीकारतील त्या दिनांकापासून ५ वर्षांकरीता हे पद धारण करतील.

# कल्याणातही बांग्लादेशी - तिघांना अटक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ कुणाल म्हात्रे प्रतिनिधी

कल्याणमध्ये तीन बांग्लादेशी महिलांना अटक करण्यात आली असून कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी हि कारवाई केली आहे. परवीन शेख, खादीजा शेख, आणि रिमा सरदार अशी या बांग्लादेशी महिलांची नावे असून कल्याण स्टेशन परिसरातून त्यांना अटक केली आहे. महात्मा फुले चौक पोलिसांनी काही दिवसांपूर्वी पिटा कायद्यांतर्गत काही महिलांना अटक करण्यात आली होती. यामध्ये 13 महिलांची यामधून सुटका करण्यात आली होती. त्याअनुषंगाने वरिष्ठ पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांच्या मार्फत तपास सुरू असतांना काही बांग्लादेशी महिला स्टेशन परिसरात येत असल्याची माहिती मिळाली. त्याअनुषंगाने स्टेशन परिसरात कारवाई केली असता तीन बांग्लादेशी मिळून आल्या असून याबाबत गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली असल्याची पोलिस अधिकारी विकास मडके यांनी दिली.

# गीतासार



**अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम ।**
**यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः । १-४५ ।**

**अर्थ**

अरेरे! किती खेदाची गोष्ट आहे! आम्ही बुद्धिमान असूनही राज्य आणि सुख यांच्या लोभाने स्वजनांना ठार मारायला तयार झालो, हे केवढे मोठे पाप करायला उद्युक्त झालो बरे! । १-४५।

**यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत । १-४६ ।**

**अर्थ**

जरी शस्त्ररहित व प्रतिकार न करणाऱ्या मला हातात शस्त्र घेतलेल्या धृतराष्ट्रपुत्रांनी रणात ठार मारले, तरी ते मला अधिक कल्याणकारक ठरेल. । १-४६ ।

**सञ्जय उवाच**
**एवमुक्त्वार्जुनः सङ्ख्ये रथोपस्थ उपाविशत ।**
**विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः । १-४७ ।**

**अर्थ**

संजय म्हणाले, रणांगणावर दुःखाने मन उद्विग्न झालेला अर्जुन एवढे बोलून बाणासह धनुष्य टाकून देऊन रथाच्या मागील भागात बसला.।१-४७।

# संघर्षापासून स्टारडमपर्यंत

## कौन बनेगा करोडपती अमिताभ बच्चन यांच्या 'जंजीर'च्या आठवणींना उजाळा

सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील कौन बनेगा करोडपती हा लोकप्रिय शो एक लक्षणीय माइलस्टोन साजरा करत आहे- दैदीप्यमान 25 वर्षे- ज्ञानाची, स्वप्ने खरी करण्याची आणि जीवन पालटून टाकणाऱ्या क्षणांची! हा भव्य आनंद सोहळा 'ज्ञान का रजत महोत्सव' 20 जानेवारीपासून सुरू होत आहे, जो सुखद आठवणी, उत्साह आणि अविस्मरणीय क्षणांनी भरलेला असेल.



हा प्रसंग आणखी विशेष केला, तो कठुआहून आलेल्या विनय गुप्ता या स्पर्धकाने. आपल्या गावाचे अभिमानाने प्रतिनिधित्व करणाऱ्या विनय गुप्ताने सांगितले की, त्याच्या गावातून KBC मध्ये आलेला तो पहिला स्पर्धक आहे. अभिमानाने आणि दृढतेने KBC च्या हॉटसीटवर विराजमान झालेला विनय KBC मध्ये त्याचे येणे ही केवळ त्याची स्वतःची स्वप्ने साकार करण्याची नाही, तर आपल्या गावकऱ्यांना मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी परिश्रम करण्याची प्रेरणा देण्याची एक संधी म्हणून बघत होता. या खेळादरम्यान अमिताभ बच्चनचा फॅन असणाऱ्या विनयने त्यांना 'जंजीर' चित्रपटातील प्रसिद्ध संवाद म्हणण्याचा आग्रह केला. त्याला प्रतिसाद देताना एक हृदयस्पर्शी आठवण शेअर करत श्री. बच्चन म्हणाले, "मी दोन तीन चित्रपटांत काम केले होते, पण त्यात मला यश आले नव्हते. त्यामुळे मी हताश झालो होतो. मुंबईला येण्याअगोदर मी कोलकाता येथे नोकरी करत होतो, जिकडे मी फक्त 400-500 रु. महिना कमवत होतो. पण जेव्हा मी मुंबईत आलो, तेव्हा इकडे जम बसवण्याचा निर्धार करून मी आलो होतो. मी विचार केला की, जर मला चित्रपट मिळाला नाही, तर मी टॅक्सी चालवीन. मी माझा ड्रायव्हिंग लायसन्स देखील तयार ठेवला होता. पण, मला काम मिळाले. अब्बास साब यांनी मला पहिला ब्रेक दिला. जंजीर चित्रपट सलीम-जावेद यांनी लिहिला होता, जो माझ्या कारकिर्दीतला टर्निंग पॉइंट ठरला. त्यावेळी राजेश खन्ना हा भारतातील सर्वात मोठा सुपरस्टार होता. काय त्याचा ऑरा होता, काय फॉलोइंग होते.. त्याला लोकांनी इतके डोक्यावर घेतले होते की, तो आपल्या गाडीतून आला की महिला त्याच्या कारच्या टायरला लागलेली धूळ आशीर्वाद म्हणून मस्तकी लावत असत. मी तर तेव्हा कोणीच नव्हतो. पण तरीही सलीम जावेद माझ्याकडे आले आणि त्यांनी मला ही कथा देऊ केली. ही भूमिका मला मिळेल अशी मला अपेक्षा नव्हती पण ती मिळाली. अशा प्रकारे 'जंजीर' चित्रपट मला मिळाला."


जेव्हा बिग बींनी जावेद साब यांना विचारले की, त्यांनी त्याचे आधीचे काम पाहिले आहे का? तेव्हा ते म्हणाले होते, "होय, मी पाहिले आहेत." बिग बी पुढे सांगतात, "जावेद साबनी मला सांगितले की, माझ्या बॉम्बे टू गोवा चित्रपटात एक असे दृश्य आहे की मी एका हॉटेलात बसलो आहे आणि त्यावेळी शत्रुघ्न सिन्हा येऊन मला थप्पड मारतो. त्या दृश्यात आमच्यात लगेच मारामारी सुरू होणे अपेक्षित होते. पण तसे न करता मी नुसता उठून उभा राहतो आणि मी खात असलेला सँडविच खाणे चालू ठेवतो. ते दृश्य पाहून जावेद साब यांना विश्वास वाटला होता की मी 'जंजीर'ची भूमिका पेलू शकेन."

त्यानंतर अमिताभ बच्चन यांनी 'जंजीर' चित्रपटातील आपला प्रसिद्ध संवाद सादर केला, "जब तक बैठने को न कहा जाए, सीधी तरह खड़े रहो. ये पुलिस स्टेशन है, तुम्हारे बाप का घर नहीं." त्यानंतर हसत हसत बिग बी म्हणाले, "तो माझा कामाचा पहिला दिवस होता आणि हा संवाद मला प्राण सरांसमोर बोलायचा होता, जे स्वतः अत्यंत प्रतिभावान कलाकार आहेत. त्यांना या ओळी ऐकवणे मला आधी थोडे जड गेले, पण त्यांनी मला धीर दिला आणि विना-संकोच संवाद म्हणायला सांगितले."

हे अविस्मरणीय क्षण बघायला विसरू नका, 20 जानेवारीपासून सुरू होत असलेल्या "कौन बनेगा करोडपती - ज्ञान का रजत महोत्सव"मध्ये दर सोमवार ते शुक्रवार रात्री 9:00 वाजता फक्त सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर.

### तेथे कर माझे जुळती

# रासबिहारी बोस स्मृतिदिन



**(२५ मे १८८६ - २१ जानेवारी १९४५)**

जहाल क्रांतिकारी रासबिहारी बोस यांच्या हयातीत आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही तरी, स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान फार मोठे आहे. कसे ते पाहू यात. भारतीय स्वातंत्र्यांकरिता परदेशात राहून क्रांतिकार्य करणाऱ्या पं. श्यामजी कृष्ण वर्मा, नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर व मादम कामा यांच्या सारखेच रासबिहारी बोस हे थोर क्रांतिकारक होते. त्यांचा जन्म 25 मे 1886 रोजी प. बंगालमधील वर्धमान जिल्ह्यातील सुबलदाह गावी झाला. विनोद बिहारी बोस हे त्यांचे वडिल. विद्यार्थी दशेतच त्यांचा क्रांतिकारी संघटनांशी संबंध प्रस्थापित झाला होता. देशात सर्वत्र स्वातंत्र्य चळवळी मूळ धरू लागल्या होत्या. जन आंदोलने व सशस्त्र क्रांती आणि सनदशीर चळवळ इत्यादी मार्गांनी भारत मातेला स्वातंत्र्य मिळवून देणे हे एकच ध्येय सर्व भारतीयांच्या मनात होते. रासबिहारी शाळेत असताना अभ्यासापेक्षाही क्रांतिकारकांविषयी बातम्या ऐकण्यात अधिक रंगून जात असत. आपल्या मुलाने प्रामाणिकपणे अभ्यास करून नोकरी करावी असे त्यांच्या वडिलांना वाटत होते. परंतु वडिलांनी शिक्षणपूर्ण होण्यापूर्वीच त्यांना डेहराडून येथील वनखात्याच्या कचेरीत नोकरीस लावले नोकरी करीत असताना त्यांनी बंगाल व पंजाब मधील क्रांतिकारकांशी संधान बांधले. अनन्वित अत्याचार करणाऱ्या तत्कालीन अंमलदाराला अर्थात व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंग्जला ठार मारण्याचा त्यांनी निश्चय केला. दिनांक 23 डिसेंबर 1912 रोजी हत्तीच्या अंबारीत बसून लॉर्ड हार्डिंग्ज दिल्लीत प्रवेश करीत होता. कलकत्त्याहून दिल्ली येथे राजधानी आणण्याचा समारंभ चालू होता. मोठी व भव्य मिरवणूक निघाली होती. रासबिहारींचा सहकारी वसंत कुमार यांनी त्याच्यावर पहिला बॉम्ब टाकला. हार्डिंग्ज जखमी झाला. हत्तीचा माहुत जागीच ठार झाला, स्फोट करून रासबिहारी व वसंतकुमार दोघेही गर्दीत दिसेनासे झाले. पोलीस तपासात या दोघांची नावे कळताच त्यांना पकडण्यासाठी त्यांच्यावर पकड वॉरंट काढण्यात आले. त्यांना पकडून देणाऱ्यास बारा हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केले बरेच दिवस ते पोलिसांना सापडले नाहीत. पोलिसांचा ससेमिरा चुकविण्याकरिता रासबिहारी जपान येथे गेले. रासबिहारी बोस यांनी टोकियोमध्ये हॉटेल उघडून तेथे भारतीयांना संघटित केले. तेथून क्रांतिकारकांना ते शस्त्रे पुरवू लागले. रासबिहारी जपानमध्ये असल्याचे समजताच ब्रिटिश सरकारने त्यांना आपल्या ताब्यात देण्याविषयी जपान सरकारला गळ घातली. जपानी पोलीस मागावर असतांना ते एका स्वातंत्र्य प्रिय अशा जपानी श्रीमंत व्यक्ती टोयामा यांच्याकडे सुमारे आठ वर्षे अज्ञातवासात राहिले. पुढे त्यांनी एका जपानी महिलेशी सन 1916 मध्ये लग्न केले. त्यामुळे त्यांना जपानचे नागरिकत्व मिळाले. जपानी भाषा शिकून त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. 'न्यू एशिया या वृत्तपत्रात त्यांनी लेखन केले. पत्रकार व लेखक म्हणून ते कार्यरत राहिले. त्यांनी जपानी भाषेत 'रामायण' चे भाषांतर केले. तसेच जपानमध्ये राहून त्यांनी शरणार्थी सैनिकांच्या मदतीने 'आझाद हिंद सेना' स्थापन केली. जपान सरकारच्या मदतीने याच आझाद हिंद सेनेचे नेतृत्व नंतरच्या काळात सुभाष चंद्र बोस यांनी केले. आणि या सेनेला विशाल रूप देऊन "चलो दिल्ली" ची घोषणा सुभाषचंद्र बोस यांनी दिली. आणि ते दिल्लीकडे कूच करते झाले. अशा या थोर क्रांतिकारकाचा मृत्यू 21 जानेवारी 1945 रोजी झाला. मातृभूमीला परकीय शत्रूच्या तावडीतून सोडविणारा आणखी एक मोहरा गळाला. रासबिहारी बोस यांच्या सह हिंदी क्रांतिकारकांच्या कल्पकतेला व शौर्याला सलाम।



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

# शारीरिक स्वास्थासाठी खेळांची आवड जोपासावी

## - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी) : जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन दि. १६ जानेवारी, रोजी लोधा वर्ल्ड स्कूल, ओलंपिक स्पोर्ट्स सेंटर, पलावा सिटी, कल्याण येथे करण्यात आला होता. क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व क्रीडा क्षेत्रातील टेबल टेनिसपटू शिवप्रिया यांच्या हस्ते मशाल पेटवून करण्यात आले असून जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांनी क्रीडा महोत्सवाचे उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला असून सर्वांनी दिवसभर विविध खेळांचा आनंद घेतला. अधिकारी-कर्मचारी यांनी शारिरीक स्वास्थासाठी खेळांची आवड जोपासावी, असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

सर्वोत्कृष्ट संघ म्हणून सांघिक विजेते पदाचे मानकरी शहापूर तालुक्यास पारितोषिक मिळाला आहे. शहापूर तालुक्यातील खेळाडूनी उत्तम प्रकारे प्रत्येक खेळात सहभाग नोंदवला होता. कबड्डी पुरुष प्रथम क्रमांक कल्याण तालुका तर कबड्डी महिला प्रथम क्रमांक भिवंडी तालुका, खोखो पुरूष प्रथम क्रमांक मुरबाड तालुका तर खोखो महिला प्रथम क्रमांक शहापूर तालुका, बॉक्स क्रिकेट प्रथम क्रमांक अंबरनाथ तालुका, लंगडी खेळात प्रथम क्रमांक शहापूर तालुका, रस्सी खेच पुरुष प्रथम क्रमांक शहापूर तालुका तर रस्सी खेच महिला प्रथम क्रमांक अंबरनाथ तालुका, हॉलीबॉल प्रथम क्रमांक भिवंडी तालुका विजेते आहेत. यावेळी हलगीच्या तालावर मोह न आवरता विजेते संघांनी ठेका धरला.

स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक व बँक ऑफ बडोदा यांच्या सौजन्याने उत्तम नियोजन अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी करण्यात आले असून उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी आभार व्यक्त केले. तसेच कमी कालावधीत लोधा वर्ल्ड स्कूल, विशेषतः चिराग मराठे व स्वप्नील घोळे यांचे अमूल्य सहकार्यामुळे क्रीडा महोत्सव उत्साही वातावरणात पार पडला आहे.यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी



अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरुडकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग प्रमुख संदिप चव्हान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी माध्यमिक ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे, महिला व बाल विकास विभाग प्रमुख संजय बागुल, बांधकाम विभाग प्रमुख संदिप चव्हाण, जिल्हा कृषी अधिकारी एम. एम. बाचोटीकर, लघुपाट बंधारे विभाग प्रमुख दिलीप जोकार, सर्व तालुकास्तरीय गट विकास अधिकारी, विभाग प्रमुख तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. क्रीडा महोत्सवात विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. कबड्डी, खोखो, बॉक्स क्रिकेट, लंगडी, रस्सी खेच हे खेळ सांघिक पध्दतीने खेळ असून वैयक्तिक खेळांमध्ये महिला व पुरुषांसाठी १०० मिटर धावणे, गोळा फेक, बॅडमिंटन, टेबल टेनिस, स्कवॅश, कॅरम, बुद्धिबळ, संगीत खुर्ची, जलतरण अशा स्पर्धांमध्ये अधिकारी-कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला होता. क्रीडा स्पर्धेसाठी जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा स्तर, तालुका स्तर, ग्रामपंचायत स्तरावरील सर्व कर्मचारी वर्ग व शिक्षक वर्ग सहभागी झाले होते.

### आरोग्य टिप्स

# हा रस फायद्यांचा खजिना



आवळा आणि गाजर, दोन्ही जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध आहेत. त्यांचा रस पिल्याने शरीराला अनेक फायदे मिळतात, त्यापैकी काही मुख्य म्हणजे...

१. खराब कोलेस्ट्रॉल कमी करते: आवळ्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर खराब कोलेस्ट्रॉल (LDL) कमी करण्यास मदत करतात, तर गाजरमध्ये असलेले जीवनसत्त्वे A आणि K कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात.

२. रोगप्रतिकारक शक्ती वाढवते: आवळा हा व्हिटॅमिन सीचा खजिना आहे, जो रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतो आणि शरीराचे रोगांपासून संरक्षण करतो. गाजरांमध्ये असलेले व्हिटॅमिन ए दृष्टीसाठी देखील फायदेशीर आहे.

३. पचनसंस्था मजबूत करते: आवळा आणि गाजर दोन्ही पचन सुधारण्यास मदत करतात. आवळा पचनक्रिया नियंत्रित करतो, तर गाजर पचनक्रिया सुलभ करतो.

४. रक्तदाब नियंत्रित करते: आवळ्यामध्ये असलेले पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते.

५. त्वचेसाठी फायदेशीर: आवळा आणि गाजर दोन्ही त्वचेसाठी फायदेशीर आहेत. आवळा त्वचेला चमक देतो, तर गाजर त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतो.

तुम्ही सकाळी रिकाम्या पोटी किंवा संध्याकाळी जेवणानंतर आवळा आणि गाजराचा रस पिऊ शकता.

# केडीएमसीच्यावतीने सफाई मित्रांना प्रशिक्षण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग, जल नि:सारण- मल नि:सारण विभाग यांच्या वतीने व दिव्यस्वप्न फांऊडेशन, कोल्हापूर यांच्या सहाय्याने स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ अंतर्गत महापालिकेच्या कल्याण (प.) येथील आधारवाडी एसटीपी प्रकल्प येथे ड्रेनेज मध्ये काम करणाऱ्या सफाई मित्र यांच्याकरिता प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाकरता जवळपास ५० सफाई मित्र उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये उपस्थित सफाई मित्र यांना ड्रेनेज मध्ये काम करताना घ्यावयाची काळजी, काम करताना पीपीई किट वापर प्रात्यक्षिक व त्याचे महत्त्व, वैयक्तिक स्वास्थ्य सुरक्षा, मॅन्युअल स्कॅवेंजर ॲक्ट २०१३ बद्दल माहिती देण्यात आली. त्याचबरोबर सफाई मित्र यांच्याकरीता लाभदायक असलेल्या शासकीय योजनांबाबत विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

दिव्यस्वप्न फाउंडेशनच्या प्रशिक्षक ऐश्वर्या जोशी, शिवराज जाधव व अमर लोखंडे यांच्या मार्फत हे प्रशिक्षण संपन्न करण्यात आले असून या प्रशिक्षणा दरम्यान महापालिकेच्या मल नि:सारण विभागाचे कार्यकारी अभियंता घनश्याम नवांगूळ, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता योगेश गोटेकर, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) राजू राठोड यांच्यासह मलनि:सारण विभागातील इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता. त्याचप्रमाणे ग्रेव्हीट इंजिनीरिंग वर्क्स मुंबई यांचे प्रतिनिधी देखील प्रशिक्षणाकरीता उपस्थित होते.

या प्रशिक्षणामध्ये दरमहा चांगले काम करणाऱ्या सफाई मित्रांना मासिक उत्कृष्ट सफाई मित्र पुरस्कार प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व सफाई मित्रांना पीपीई किटचे वाटप करण्यात आले.

### स्वामी विवेकानंद संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त

# राष्ट्रीय युवा दिन उत्साहात संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता शहापूर ग्रामिण(प्रतिनिधी) : राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामी विवेकानंद संस्थेचा २८ वा वर्धापन दिन आणि स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती तसेच राष्ट्रीय युवा दिनाचा कार्यक्रम शहापूर तालुक्यातील मौजे पाली येथील संस्थेच्या कार्यालयात 12 जानेवारी 2025 रोजी मोठया आनंदात व उत्साहात संपन्न झाला.



हा कार्यक्रम मानव सेवा विकास फाऊंडेशन, अमरावती या संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक व माजी प्राचार्य व्ही.एस.पाटील सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वाडा तालुक्यातील एस.जी. देशमुख शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर देशमुख, उत्कर्ष महाविद्यालयाचे माजी सेक्रेटरी अरुण परशराम भालेकर, लायन्स क्लब ऑफ शहापूरचे सेक्रेटरी मुकेश दामोदरे, वासिंद येथील कम्प्लिट कॉम्प्युटर एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संचालक विनायक विष्णू पवार, वासिंद चॅलेंजर्स ट्रेकर्सचे संचालक श्याम शेलार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्ज्वलन केले. स्वामी विवेकानंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर सर यांनी उपस्थितांचे सहर्ष स्वागत करून संस्थेने आजतागायत विविध क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य व संस्थेच्या भविष्यातील योजना आदी बाबींवर प्रकाश टाकत आपले प्रास्ताविक सादर केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व्ही.एस.पाटील सर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, "राष्ट्र उभारणीत तरुणांचा सिंहाचा वाटा असतो. देशाचा विकास करून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याची ताकद युवकांत आहे. तरुण हे देशाचे बिल्डिंग ब्लॉक्स आहेत. त्यामुळेच आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात युवापिढीने राष्ट्रविकासासाठी झोकून काम करण्याची नितांत गरज आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीनेही आपल्या देशाच्या विकासासाठी झटले पाहिजे."

यावेळी स्वामी विवेकानंद संस्थेचे सचिव संजय तरणे, सहसचिव तथा पोलीस पाटील साईनाथ तरणे, अन्य पदाधिकारी अनंता तरणे, गीतांजली म्हसकर, रसिका म्हसकर, शर्वरी तरणे तसेच मौजे पाली येथील ग्रामस्थ शारदाबाई म्हसकर, अनिल व कैलास म्हसकर, दर्शना व प्रगती म्हसकर, वैशाली भोईर आणि संकेत व सलोनी तरणे, विद्या व जीवन म्हसकर तसेच पंचक्रोशीतील ओंकार देशमुख, अजित दुधाळे अन्य युवा-युवती उपस्थित होते.

संजय तरणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार व्यक्त केले.



# गजराबाई संभू शेलार यांचे वृद्धापकाळाने निधन

श्री भगवान संभू शेलार, शांताराम संभू शेलार अनंता संभू शेलार यांच्या मातोश्री कै. गजराबाई संभू शेलार यांचें दि.२०/०१/२०२५ रोजी वृद्धापकाळाने देवाज्ञा झाली आहे. तरी त्यांचा अंत्यविधी आज संध्याकाळी ठिक ०६:३०वा . स्मशानभूमी कुंदे येथे होणार आहे. तरी ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

# सात कलमी - शत दिवसीय आराखडा प्रशासनाला मिळतोय शिस्तीचा धडा !

"क्षेत्रीय कार्यालयांसाठी 100 दिवसांचा कृती आराखडा" या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवार, दि.07 जानेवारी 2025 रोजी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दृक परिषदेद्वारे (Video Conferencing), उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण) एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) अजित पवार व मंत्रिमंडळाच्या उपस्थितीत संबोधित केले.

राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी 100 दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरिता आगामी 100 दिवसांमध्ये 1) संकेतस्थळ (Website), 2) सुकर जीवनमान (Ease of Living), 3) स्वच्छता (Cleanliness), 4) जनतेच्या तक्रारींचे निवारण (Grievance Redressal), 5) कार्यालयातील सोयी व सुविधा (Amenities at work place), 6) गुंतवणूक प्रसार (Investment promotion), 7) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Field visits) या मुद्द्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश या बैठकीत देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी आगामी 100 दिवसांमध्ये कृती आराखड्यानुसार कार्यवाही करावी, असे शासन निर्णयाद्वारे कळविण्यात आले आहे. सात कलमी कृती आराखड्याविषयी विस्तृत माहिती या लेखाच्या माध्यमातून जाणून घेवू या..

### 1. संकेतस्थळ (Website):-

सर्व कार्यालयांनी आपल्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवावी. कार्यालयाचे संकेतस्थळ हाताळण्यास सुलभ (Easy-to-navigate) असावे. संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील तरतुदींनुसार "Proactive Disclosures" या शीर्षकाखाली जास्तीत जास्त माहितीचे स्वयंप्रकटीकरण करण्यात यावे. वेबसाईटच्या माध्यमातून नागरिकांना सेवा उपलब्ध होईल यादृष्टीने वेबसाईट "Interactive" राहील, हे पहावे. "Data Security" बाबत आवश्यक दक्षता घेण्यात यावी. संकेतस्थळ अद्ययावत ठेवतानाच संकेतस्थळाच्या सुरक्षेबाबत (Cyber Security) आवश्यक दक्षता घ्यावी. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने (NIC), GIGW च्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे सर्व माहिती अद्ययावत करावी, तसेच विभागांची लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 मधील तरतूदींनुसार सर्व विभागाच्या सेवांबाबतची माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी विभागांना सहकार्य करावे.



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी 100 दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरिता आगामी 100 दिवसांमध्ये प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी आगामी 100 दिवसांमध्ये कृती आराखड्यानुसार कार्यवाही करावी, असे शासन निर्णयाद्वारे कळविण्यात आले आहे...**

### 2. सुकर जीवनमान (Ease of Living):-

नागरिकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पद्धतींचे पुनर्विलोकन करुन प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये किमान दोन सेवा अतिशय सुलभ पध्दतीने द्याव्यात. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरीता सातत्याने प्रयत्न करावेत.

### 3. स्वच्छता (Cleanliness):-

प्रचलित नियम, कार्यपद्धतीप्रमाणे शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये निंदणीकरण, नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया प्राधान्याने व निरंतरपणे राबविण्यात यावी. याअंतर्गत कार्यालयांमधील अभिलेख निंदणीकरण करुन तपासाअंती आवश्यक नसल्यास नष्ट करण्यात यावेत. तसेच, सर्व अभिलेखांचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.9/18(र.-व-का.), दिनांक 15.02.2018 अनुसार वर्गीकरण करण्यात यावे. कार्यालयांमधील जुन्या व निरुपयोगी जडवस्तूंची (उदा. संगणक, टेबल, खुर्च्या, कपाटे, इत्यादी) विहित कार्यपद्धतीने विल्हेवाट लावण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयांच्या आवारात असणारी (विशेषतः पोलीस विभागाकडील) जुनी व वापरात नसलेली वाहने यांचे विहित पद्धतीने निर्लेखन करण्यात यावे.

### 4. जनतेच्या तक्रारींचे निवारण (Grievance Redressal):-

नागरिकांकडून कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे ("आपले सरकार", "P.G. Portal", यांसह) त्वरेने निराकरण करण्यात यावे व दि.1 जानेवारी 2025 पूर्वीची प्रलंबितता शून्य करावी. सर्व अधिकाऱ्यांनी कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांच्या भेटीसाठी आठवड्यातील दैनंदिन वेळ राखून ठेवावी व तसे फलक कार्यालयामध्ये दर्शनी भागात लावण्यात यावेत. दौऱ्यावर असल्यास अभ्यागतांना भेट देण्यासाठी अन्य अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर "लोकशाही दिनाची" अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यात यावी. तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर निवारण करता येतील असे प्रश्न/समस्या तत्परतेने सोडविले गेल्यास नागरिकांना शासनाकडे पाठपुरावा करावा लागणार नाही.

### 5. कार्यालयातील सोयी व सुविधा (Amenities at work place):-

कार्यालयांमधील कर्मचारी वर्ग तसेच येणारे अभ्यागत यांच्याकरिता पिण्याच्या पाण्याची योग्य व कायमस्वरुपी व्यवस्था असावी. कर्मचारी आणि अभ्यागत यांच्यासाठी कार्यालय व कार्यालयाच्या आवारातील प्रसाधनगृहे स्वच्छ ठेवण्यात यावीत. तसेच प्रसाधनगृह नादुरूस्त असल्यास आवश्यक ती दुरुस्ती तातडीने करावी. कार्यालयांमध्ये येणाऱ्या अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय असावे. कार्यालयांमध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक असावेत. कार्यालयांमधील वातावरण प्रसन्न व आल्हाददायक राहील याकरिता विशेष प्रयत्न करून कार्यालयाचे व परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात यावे. याकरिता आवश्यकतेनुसार जिल्हा नियोजन समितीकडील निधीमधून खर्च करण्यात यावा.

### 6. गुंतवणुकीस प्रोत्साहन (Investment promotion):-

राज्यामध्ये औद्योगिक धोरण राबविताना विविध ठिकाणांवरुन येणाऱ्या गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि गुंतवणूक वाढावी याकरिता सामूहिक प्रयत्न करण्यात यावेत. व्यापारी वर्गाच्या संघटनांशी चर्चा करुन त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करावा. गुंतवणूकदार उद्योजकांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण तसेच कायदा व सुव्यवस्था या बाबींची प्रभावीपणे हाताळणी करण्यात यावी.

### 7. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Field visits):-

आठवड्यातून किमान दोन दिवस अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देवून पाहणी करावी. केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्त्वाच्या कार्यक्रम / प्रकल्पांना (Flagship Programme/Projects) प्रत्यक्ष भेटी देवून त्यांच्या अंमलबजावणी व प्रगतीची पाहणी करुन त्याचे पर्यवेक्षण करावे. क्षेत्रीय भेटीदरम्यान महत्वाचे घटक असणाऱ्या ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देवून त्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवावी. ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांचे अनुभव, त्यांना येणाऱ्या अडचणी व त्यांनी मांडलेल्या सूचना गांभीर्याने घेवून त्यावर तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

हा 100 दिवसांचा 7 कलमी कृती आराखडा दि.15 एप्रिल 2025 पर्यंत यशस्वीपणे राबवून त्याचा अहवाल आपल्या वरिष्ठांना दि.20 एप्रिल 2025 पर्यंत सादर करावा, असे शासनाच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दि.13 जानेवारी 2025 रोजी जारी केलेल्या शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-2025/प्र.क्र.7/र.व.का.-1 द्वारे कळविले आहे.

ठाणे जिल्ह्यातील प्रशासनही जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सर्व महानगरपालिका आयुक्त, सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांच्यासह सर्व शासकीय-निमशासकीय विभागांचे विभाग/कार्यालयप्रमुख, कर्मचारी यांनीदेखील या सप्तसूत्रीची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाच्या या कृतीशील प्रयत्नांचे ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी स्वागत केले आहे.

**- मनोज सुमन शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे**

## यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारासाठी अर्ज पाठविण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

सन 2024 वर्षातील मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी राज्य शासनाच्यावतीने स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार देण्यात येणार आहे. 1 जानेवारी 2024 ते 31 डिसेंबर 2024 या कालावधीत प्रकाशित झालेले प्रथम आवृत्ती पुस्तके स्पर्धेसाठी पात्र आहेत. लेखकांनी पुरस्काराच्या प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालयात (मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून) दि. 31 जानेवारी, 2025 पर्यंत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत मुंबई येथे आपले साहित्य पाठवावीत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई 400 025 यांच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता अन्यत्र संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्वसाधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध आहेत. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार 2024 नियमावली व प्रवेशिका' या शीर्षाखाली व 'What's new' या सदरात 'Late Yashwantrao Chavan State Literature Award 2024 Rules Book and Application Form' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील. प्रवेशिका पूर्णतः भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक 1 ते 31 जानेवारी 2025 या विहित कालावधीत पोहचतील अशा पाठवाव्यात. लेखक/प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील लेखक/प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई 400 025 येथे पाठवाव्यात. मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून अन्य ठिकाणच्या लेखक/प्रकाशकांनी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हे साहित्य दिनांक 1 जानेवारी, 2025 ते 31 जानेवारी 2025 या विहित कालावधीत पाठवावे, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद आहे. लेखक/प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर/पाकीटावर 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार 2024 साठी प्रवेशिका'असा स्पष्ट उल्लेख करावा. प्रवेशिका व पुस्तके स्विकारण्याचा अंतिम दिनांक 31 जानेवारी, 2025 हा राहील. विहित कालमर्यादेनंतर येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्विकारल्या जाणार नाहीत.

# देशभरात 'प्री मॅरेज काऊंसिलिंग केंद्र उभारणार -राष्ट्रीय महिला आयोग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता भाईंदर(प्रतिनिधी) :

-देशात तरुणांमधील घटस्फोटांच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. ही एक चिंतेची बाब असून त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रावर होऊ लागला आहे. त्यामुळे तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी देशातील प्रमुख शहरात विवाहपूर्व समुपदेशन ('प्री मॅरेज काऊंसिलिंग) केंद्र उभारण्याचा निर्णय राष्टीय महिला आयोगाने घेतला आहे. या केंद्राचे लोकार्पण येत्या ८ मार्च रोजी म्हणजे महिला दिनी केले जाणार आहे.

सामाजिक दायित्व निधीच्या मदतीने महिलांचे सशक्तिकरण करण्यासाठी उत्तनच्या राम भाऊ म्हाळगी प्रबोधिनी मध्ये राष्ट्रीय महिला आयोग व म्हाळगी प्रबोधनी संस्थेच्या संयुक्त विद्यमानाने परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यात देशभरातील प्रमुख खासगी संस्थेच्या प्रतिनिधीनी तसेच सामाजिक संस्थांनी सहभाग घेतला होता.यावेळी सामाजिक दायित्व निधीच्या मदतीने महिलांना सशक्त करण्याच्या हेतूने शिक्षण, संधी आणि आर्थिक सहकार्य देण्यासारख्या प्रमुख बाबींवर मंथन करण्यात आले. यात दायित्व निधीचा वापर कशाप्रकारे होऊ शकतो याबाबतचे मार्गदर्शन आयोगाकडून देण्यात आले.

या प्रसंगी बोलत असताना देशात तरुणांमध्ये वाढते घटस्फोटाचे प्रमाण ही एक चिंतेची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.पूर्वीच्या काळी एकत्रित कौटुंबिक व्यवस्थेत राहत असल्याने तरुण मुला- मुलींना सुखी संसार करण्याचे मार्गदर्शन मिळत होते. मात्र प्रगतीच्या मार्गावर धावत असलेले तरुण आता स्वतंत्र राहण्यास प्राधन्य देत आहेत.परिणामी या तरुण मंडळींना लग्ननंतर बदलणाऱ्या परिस्थितीला हाताळणे व त्यातून मार्ग काढणे कठीण होत आहे. यावर अभ्यास केले असता ही केवळ कौटुंबिक स्तरावरची समस्या नसून त्याचा व्यापक परिणाम इतर गोष्टीवर देखील होऊ लागला आहे.त्यामुळे यावर तोडगा काढण्यासाठी आयोगातर्फे देशातल्या प्रमुख शहरात 'प्री मॅरेज काऊंसिलिंग केंद्र' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.यातील काही केंद्राचे येत्या ८ मार्च रोजी लोकार्पण करणार असल्याची माहिती रहाटकर यांनी दिली.

लग्न व्यवस्थेबाबत तरुणांना जागरूक करण्यासाठी त्यांना वेळेत मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. यात देशात नोकरी उपलब्ध करून देणाऱ्या संस्था प्रमुख भूमिका बाजावू शकतात.त्यामुळे अशा संस्थांनी सामाजिक दायित्व निधीचा वापर करून कार्यालय ठिकाणी "प्री मॅरेज काऊंसिलिंग' केंद्र उभारण्यास सुरुवात करावी. यात राष्टीय महिला आयोग सहयोग करणार असल्याचे अध्यक्षा विजया रहाटकर यांनी आवाहन केले आहे.

## राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत रॅलीचे आयोजन

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या शांतीनगर माध्यमिक विद्यालय कचेरी पाडा येथे दिनांक 21/1/2025 रोजी सकाळी 10.30 ते 12.30 वाजता माननीय प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य यांचे अध्यक्षतेखाली रॅलीचे आयोजन केलेले आहे. विद्यालयातील 250 ते 300 विद्यार्थी या रॅलीमध्ये उपस्थित राहणार आहे. तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमास कृपया उपस्थित रहावे.

## डॉ. दीपमाला साळींचे संशोधन देशाच्या प्रगतीपथावर नेणार

**- मंत्री तथा महाज्योतीचे अध्यक्ष अतुल सावे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)

'महाज्योती'च्या डॉ. दीपमाला साळी या विद्यार्थीनीने केलेले हे संशोधन अभिमानास्पद आहे. त्यांनी 'महाज्योती'सह देशाचे नावलौकिक करण्याचे काम केले आहे.

'महाज्योती'कडून मिळणाऱ्या विद्यावेतनातून राज्यातील हजारो विद्यार्थी हे प्रगतीपथावर गेले आहेत. 'महाज्योती'कडून ज्युनिअर रिसर्च फेलोशिप (जेआरएफ) व सीनियर रिसर्च फ़ेलोशिप (एसआरएफ) विद्यावेतन, अधिछात्रवृत्तीची रक्कम तसेच घरभाडे भत्ता देण्यात येत आहे. पीएचडी संशोधकांची भरीव कामगिरी ही देशाला प्रगतीपथावर नेईल, असे मनोगत इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तथा महाज्योती, नागपूरचे अध्यक्ष श्री. अतुल सावे यांनी दिले.

दिवसेंदिवस महाज्योतीचे संशोधकाचे घवघवीत यश मिळवित आहे. त्यामुळेच आज डॉ. साळी यांची कामगिरी अभिमानास्पद असल्याचेही अतुल सावे म्हणाले. तसेच पुढील वाटचालीसाठी डॉ. साळी यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत, असे महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर प्रकल्प संचालक कुणाल शिरसाठे यांनी कळविले आहे.

## शैक्षणिक वर्षाकरिता आर.टी.ई ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता भिवंडी(प्रतिनिधी) :

भिवंडी निजामपुर शहरतील सर्व नागरिकांना कळविण्यात येते कि, सन २०२५ २०२६ या शैक्षणिक वर्षाकरिता RTE २५% ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत बालकाच्या अर्ज नोंदणीसाठी https://student.maharashtra.gov.in/ adm_portal/Users/rte_index शासनाकडून या वेबसाईट वर सन २०२५ २०२६ या वर्षासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (सी) (१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वंयअर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा पोलीस कल्याणकारी शाळा (विनाअनुदानीत) आणि महानगरपालिका शाळा (स्वंय अर्थसहायित शाळा) शाळमध्ये आरटीई RTE२५% प्रवेश प्रक्रीया ऑनलाईन पदधतीने राबविण्यात येत आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१ यांचे जा.क्र.आरटीई २५ टक्के /२०२५/८०१/११५ दिनांक १३/०१/२०२५ बालकांच्या पालकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रीया मंगळवार दिनांक १४/०१/२०२५ ते २७/०१/२०२५ या कालावधीपर्यंत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर प्रक्रियेसाठी पात्र असणाऱ्या (वंचित गट SC/ST/NT/VJ/OBC/SBC, दुर्बल गट. १ लाखापेक्षा कमी उत्पन्न, दिव्यांग बालकाचे ४०% अपंगत्व असलेल्या जास्तीत जास्त पालकांनी प्रवेश प्रकियेत आपल्या बालकांची अर्ज नोंदणी करून सदर सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मा. श्री. अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी यानी केले आहे.

# महानगरपालिकेच्या शाळांची सुरक्षा सी.सी.टी.व्ही.च्या निगराणीत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)

महानगरपालिका आयुक्त डॉ.इंदू राणी जाखड यांच्या निर्देशानुसार महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरिता महानगरपालिकेच्या एकूण 61 शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेण्यात आला असून या शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम तात्काळ सुरू करण्यात आलेले आहे.

दिनांक 21/ 8 /2024 रोजीच्या शासन निर्णयानुसार खाजगी, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले होते, त्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने तात्काळ सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम हाती घेतले असून माहे फेब्रुवारी 2025 अखेरीस महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार शाळेतील सीसीटीव्ही यंत्रणेची ठराविक अंतराने फुटेज तपासणी व काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्यावर कार्यवाही करण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीची असणार आहे. मुख्याध्यापकांनी आठवड्यातून किमान तीन वेळा फुटेज तपासणी करणे आवश्यक राहील. शाळेतील सीसीटीव्ही फुटेज मध्ये काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास याबाबत स्थानिक पोलीस प्रशासनाशी संपर्क साधून योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील. महापालिकेच्या एकूण 61 शाळांमध्ये विद्यार्थी/विद्यार्थिनी यांचे सुरक्षिततेकरिता एकूण 502 कॅमेरे बसविण्यात येणार असून सर्व शाळांमध्ये मुख्याध्यापक यांचे कक्षेत सीसीटीव्ही मॉनिटर बसविण्यात येणार असल्याची माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

## राणीच्या बागेत पुष्पोत्सव बहरणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :

भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयात (राणीची बाग) यंदा ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत पुष्पोत्सव होणार असून या महोत्सवाचे हे २८ वा वर्ष आहे. मुंबईकरांना हजारो प्रजातीची रंगबिरंगी फुले आणि अन्य वनस्पती, त्यांच्या आकर्षक रचना, सजावट पाहण्याची संधी मिळणार आहे.

समृद्ध वारसा असलेल्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालयात दरवर्षी पुष्पोत्सवाचे आयोजन केले जाते. महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपआयुक्त चंदा जाधव यांच्या देखरेखीखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

# शुभमच्या शोधासाठी पोलिसांचे सहकार्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर(प्रतिनिधी) :

गेल्या अनेक महिन्यांपासून उल्हासनगरातुन बेपत्ता असलेल्या १६ वर्षीय शुभम या मुलाच्या शोधासाठी उल्हासनगर पोलिसांनी शोध मोहीम गतीशिल केली आहे. या शोध मोहिमेत उल्हासनगर व आसपासच्या उपनगरातील नागरिकांनी या बालकास शोधण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन उल्हासनगर पोलिसांनी केले आहे.

शहरातील कॅम्प नं.२ मधील रहिवासी असणाऱ्या १६ वर्षीय शुभमसिंग अर्जुनसिंग यादव याला २० मे २०२४ रोजी दुपारी ४, आ सुमारास एका अज्ञात व्यक्तीने आमिष दाखवून पळवून नेले होते. यावेळी शुभमने गुलाबी रंगाचा शर्ट आणि निळ्या रंगाची जीन्स घातली होती. तो मध्यम बांधा, ५ फूट ३ इंच उंच आणि गडद रंगाचा आहे. हा बालक बेपत्ता झाल्यापासून त्यांच्या कुटुंबात व परिसरात चिंता आणि अस्वस्थतेचे वातावरण आहे. गेल्या अनेक



महिन्यांपासून पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले असून शोध मोहीम अधिक तीव्र केली आहे. शुभम बाबत नागरिकांना कुठे ही, कोणत्याही प्रकारची व कधीही काहीही माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ उल्हासनगर व नजिकच्या पोलिसांशी ०२५१/२७१०००५ पोलिस उप निरीक्षक दिपक यादव यांना ९६८९८९०२६१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन केले आहे. माहिती देणाऱ्याला योग्य बक्षीस देण्याची घोषणा उल्हासनगर पोलिसांनी केली आहे.

# डोंबिवलीत हायलाईन कार्यक्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
डोंबिवली(प्रतिनिधी) :

आज दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजता डोंबिवलीतील 'होली एंजल्स जुनियर कॉलेज' मध्ये महाराष्ट्रातील पहिल्या हायलाईन कार्यक्रमाचे यजमान होऊन इतिहास रचला आहे. 'होली एंजल्स जुनियर कॉलेज' महाराष्ट्रातील पहिली शैक्षणिक संस्था बनली असून ह्या कार्यक्रमामध्ये तोशिथ नायडू, संस्थेचे माजी विद्यार्थी आणि साहसी खेळांमध असलेले व्यक्तिमत्व, यांचा सहभाग होता. तोशिथ हायलाईनच्या या कार्यक्रमात रोमांचन आयोजन आणि प्रात्यक्षिक सादर करण्यात आली.

**हायलाईन खेळाबद्दल**

हायलाईन हा एक साहसी खेळ असून ज्यामध्ये उंचीवर ताणलेल्या दोरीवर चालण्याचे धाडस असते. या खेळात जबरदस्त लक्ष, संतुलन आणि धैर्य आवश्यक असते. हा खेळ साहस करण्याचे आणि मर्यादा ओलांडण्याचे प्रतीक मानला जातो. 'होली एंजल्स जूनियर कॉलेज' विद्यार्थ्यांना साहसी खेळांच्या या अद्‌वितीय जगाशी परिचित करून देणे आणि विकासासाठी नवीन मार्ग खुले करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

**हायलाईनचा इतिहास**

हायलाईन हा स्लॅकलाईन या खेळाचा एक प्रकार असून, तो सध्या जागतिक स्तरावर सुरू झाला आहे. स्लॅकलाईन जमिनीपासून जवळ खेळला जातो. तर हायलाईन हा खेळ जड किंवा शहरी भागातील उंच ठिकाणी खेळला जातो. हा खेळ शारीरिक कौशल्य, मानसिक आणि कलात्मक अभिव्यक्ती यांचा संगम आहे. या खेळात हार्नेस आणि टेथर यासारख्या उपकरणांचा वापर केला जातो, ज्यामुळे खेळाडू सुरक्षित राहतात.

**तोशिथ नायडू यांचे योगदान**

तोशिथ नायडू हे होली एंजल्स जूनियर कॉलेजचे माजी विद्‌यार्थी असून, साहसी क्षेत्रातील एक प्रतिष्ठित नाव आहे. त्यांनी भारतात आणि परदेशात अनेक मोहिमांमध्ये सहभाग घेतला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन आपल्या शिक्षण संस्थेत करून विद्‌यार्थ्यांना आव्हाने स्वीकारण्यास, भीतीवर मात करण्यास आणि आत्मविकासासाठी संधींचा शोध घेण्यासाठी प्रेरित करू इच्छितात.

**प्राचार्यांचे विचार**

या उपक्रमाबद्दल 'होली एंजल्स जूनियर कॉलेज' चे प्राचार्य बिजॉय ओमन म्हणाले, "तोशिथ नायडू यांच्या प्रयत्नांना आमच्या संस्थेत हायलाईन कार्यक्रम आणण्यासाठी पाठिंबा देताना आम्हाला अभिमान वाटतो. विद्‌यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे, धैर्य, सर्जनशीलता आणि साहसी भावना जोपासणे, ही आमची भूमिका या कार्यक्रमाशी सुसंगत आहे. हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर लोकांचे लक्ष वेधून घेईल, असा विश्वास असून, हे महाराष्ट्रासाठी आणि संस्थेसाठीही एक महत्त्वाचा टप्पा ठरेल." होली एंजल्स जूनियर कॉलेज' चे विद्‌यार्थी आणि शिक्षक या उपक्रमाचा उत्सुकतेने वाट पाहत होते असे कॉलेजचे प्राचार्य बिजॉय ओमन यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले.

# प्रतिक्रांतीची पाळंमुळं संविधानातच

## - किरण सोनावणे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर(प्रतिनिधी) :

आपला देश आपल्या सीमेवरून सुरू होत नाही . तर, आपला देश हा आपल्या गाव, विभाग व घरापासून सुरू व्हायला हवा. आपल्या घरा जवळ एखाद्या कायद्याचं उल्लंघन होत असेल, एखाद्या कार्यालयात भ्रष्टाचार होत असल्यास, असुरक्षित - अराजकता असेल आणि आपण मुकदर्शी असु तर आपल्याला संविधानावर बोलण्याचा हक्क नाही. संविधान क्रांती - प्रतिक्रांतीची पाळंमुळं हि संविधानात रुजलेली आहे. असे गौरवोद्‌गार शिवसेना प्रवक्ते किरण सोनावणे यांनी काढले. संविधान बहुउद्देशीय संस्था आयोजित ' संविधान जागर सप्ताहात ' बोलत होते.



२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या अमृत महोत्सवी वर्ष निमित्ताने शहरातील सुभाष टेकडी उल्हासनगर -४ परिसरातील विविध समविचारी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून संविधान जागर सप्ताहाचे नियोजन करण्यात आले होते. या नुसार, सामाजिक संस्थाचे कार्यालय तथा वस्ती पातळीवर संविधान जनजागृती व माहिती प्रत्येक नागरिका पर्यंत पोहोचवण्याचा उद्देश आहे . २६ जानेवारी रोजी या सप्ताहाचा समारोप करण्यात येणार आहे. प्रा. विकास जाधव ह्यांनी संविधानातील मुलभूत हक्क व कर्तव्ये व मर्यादांवर आपल्या भाषणात प्रकाश टाकला व यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय वाघमारे, भाई रोकडे, राहुल ससाणे, माजी नगरसेवक राजेश वानखेडे, एड मनिषा इंगळे, मानवता अभियान संस्थेच्या अध्यक्ष निवेदिता जाधव आदी उपस्थित होते.

# मला मराठी बंधू भगिनींच्या प्रेमातच राहायचं आहे

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई(प्रतिनिधी) :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झ्युरिक, स्वित्झर्लंड येथे बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडतर्फे नुकतेच स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वैश्विक मराठी परिवारातील आपल्या मराठी बंधु-भगिनींशी मनमोकळा संवाद साधला.

बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडच्या प्रेमाचे मोल नाही, मला या प्रेमातच राहायचे आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आपला महाराष्ट्र भारताचे पॉवर हाऊस असून देश पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था झाल्यानंतर एक ते दोन वर्षांतच महाराष्ट्र पहिली उपराष्ट्रीय ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था होईल. एआय तंत्रज्ञानात आघाडी घेतलेला महाराष्ट्र भारताचे डेटा सेंटर कॅपिटल असल्याचे म्हणत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महाराष्ट्रात इनोव्हेशन सिटी तयार करणार असल्याचे सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला देव, देश, धर्माकरता लढायला शिकवले, आपल्या संस्कृतीचा, भाषेचा अभिमान बाळगायला शिकवले, ती शिकवण मराठी माणसाने स्वित्झर्लंडमध्येही जपली आणि पुढच्या पिढीलाही दिली, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून मराठीला ज्ञानभाषा म्हणून प्रस्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी स्वित्झर्लंडसह वैश्विक मराठी परिवारातील मराठी बंधु-भगिनी आमचे राजदूत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. याप्रसंगी बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडचे अध्यक्ष अमोल सावरकर, सेक्रेटरी किर्तीताई गद्रे, महेश बिरादार व इतर मान्यवर उपस्थित होते.

# चिरनेर परिसर बर्ड फ्लू सर्वेक्षण क्षेत्र म्हणून घोषित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण(प्रतिनिधी) :

चिरनेर येथे परसदारातील कुकुट पक्षांमध्ये मरतुक आढळल्याने रोग निदानासाठी नमुने भारतीय कृषी संशोधन परिषद अंतर्गत राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशु रोग प्रयोगशाळा, भोपाळ मध्य प्रदेश येथे रोग निदानास्तव पाठवण्यात आले होते. सदर प्रयोगशाळेने कुकुट पक्षातील मरतूक एव्हियन इन्फ्लुएंझा/ बर्ड फ्लू या रोगासाठी होकारार्थी आल्याचे कळवले आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी येथील बाधित क्षेत्रापासून एक किलोमीटर पर्यंतचा परिसर बाधित क्षेत्र व एक ते दहा किलोमीटर पर्यंत चा परिसर सर्वेक्षण क्षेत्र म्हणून घोषित केला आहे.

उरण तालुक्यातील चिरनेर येथे परसदारातील कुकुट पक्षांमध्ये मरतुक आढळल्याने रोग निदानासाठी नमुने भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी रोग अन्वेषण विभाग पुणे येथे पाठवण्यात आले होते. तेथून सदरचे नमुने भारतीय कृषी संशोधन परिषद अंतर्गत राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशु रोग प्रयोगशाळा, भोपाळ मध्य प्रदेश येथे रोग निदानास्तव पाठवण्यात आले होते. सदर प्रयोगशाळेने कुकुट पक्षातील मरतूक एव्हियन इन्फ्लुएंझा/ बर्ड फ्लू या रोगासाठी होकारार्थी आल्याचे कळवले आहे. हा आजार मानवात संक्रमित होऊ शकणारा असल्याने प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोग प्रतिबंधक अधिनियम 2009 व बर्ड फ्लू रोगप्रसार रोखण्यासाठीचा भारत सरकारचा सुधारित कृती आराखडा 2021 मधील तरतुदीनुसार माननीय जिल्हाधिकारी रायगड यांनी मौजे चिरनेर तालुका उरण जिल्हा रायगड येथील बाधित क्षेत्रापासून एक किलोमीटर पर्यंतचा परिसर बाधित क्षेत्र व एक ते दहा किलोमीटर पर्यंत चा परिसर सर्वेक्षण क्षेत्र म्हणून घोषित केला आहे.

बाधित क्षेत्रातील निरोगी दिसणारे पाळीव पक्षी, पक्षांचे मांस, अंडी, विस्टा,तूस, भुसा इत्यादी शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्याचे आदेश दिलेले आहेत. बाधित क्षेत्रातून मृत व जिवंत पक्षी,खाद्य,मांस, विस्टा, उपकरणे इत्यादींची वाहतूक करण्यास दिनांक 9 फेब्रुवारी 2025 पर्यंत मनाई करण्यात आली आहे. पशुसंवर्धन, आरोग्य, महसूल, ग्रामविकास, पोलीस, वनविभाग, परिवहन इत्यादी विभागांच्या समन्वयाने बाधित क्षेत्रात कृती आराखड्याप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे. सदर रोगस्थिती नियंत्रणात असून कुकुट व्यवसायिक व नागरिकांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगणेबाबत पशुसंवर्धन विभाग व जिल्हा प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे .

# क्रांती शुगरचा ऊसाला २८०० रुपये भाव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पारनेर(प्रतिनिधी) :

देवीभोयरे - पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथील क्रांती शुगर कारखान्याने ऊसाला इतर साखर कारखान्यांना प्रमाणेच २८०० रुपये प्रति मॅटेक्ट्रीक टन भाव दिल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे , अशी माहिती कारखान्याचे चेअरमन ज्ञानेश नवले यांनी दिली आहे .

क्रांती शुगर कारखान्या ने या वर्षी नगर जिल्ह्यात सर्वात जास्त ऊसाला शेकडा १० . ९१ टक्के उच्चांकी रिकव्हरी दिली आहे . कार्यक्षेत्र व बाहेरील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चालू वर्षीच्या गळीत हंगामातील गाळपासाठी येणाऱ्या ऊसाला प्रति मेट्रीक्ट टन २८०० रुपये भाव देण्याचे जाहीर केले असून पंधरवाडा दि . १५ नोव्हेंबर ते दि . ३० नोव्हेंबर २०२४ मध्ये कारखान्याला आलेल्या ऊसाचे पैसे २, ७०० मॅट्रीक टना प्रमाणे पैसे अदा केलेले असून उर्वरित १०० रुपये मेट्रीक टना प्रमाणे राहिलेला फरक अदा करण्यात येणार आहे , तसेच त्या पुढील पंधरवाडात ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस दिला आहे , त्यांच्या ऊसाचे बिल २८०० रुपये प्रति मेट्रीक टन दराप्रमाणे लवकरच अदा करण्यात येईल .

क्रांती शुगर कारखान्याने आज अखेर १ लाख ७२ हजार ३५१ . ४९६ मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले असून १ लाख ८६ हजार ११० पोती साखर उत्पादन झाले आहे . कारखान्या कडे पारनेर , श्रीगोंदा , नगर , श्रीरामपूर , पाथर्डी , शिरूर , जुन्नर तालुक्यातून बैलगाडी , ट्रॅक्टर , ट्रॅक द्वारे मोठ्या प्रमाणावर ऊस पुरवठा होत असल्याने कारखाना पुर्ण क्षमतेने चालविला जात असून कारखान्याची प्रति दिन ३ , ५०० मॅट्रीक टन ऊस गाळपाची क्षमता असल्याची माहिती ही कारखान्याचे चेअरमन नवले यांनी दिली आहे .

# कारुण्य ट्रस्टतर्फे अळंबी लागवडीचे प्रशिक्षण




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

कल्याणमध्ये कारुण्य संस्थेमार्फत कारितास इंडिया यांच्या समर्थनातून आळंबी लागवडीचे एकदिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. मौजे पिंपळोली, ता. कल्याण या गावात हे प्रशिक्षक्षण पार पडले.

जीवन प्रकल्पांतर्गत कारुण्य संस्थेनेने पार्टनर संस्था वसई जनहित ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्‌यमानाने महीलांसाठी अळंबी लागवडीचे प्रशिक्षण आयोजित केले व यासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून जीवन प्रकल्प वसई जनहीत ट्रस्ट चे प्रकल्प समन्वयक किसन धांगडा आणि अनिमेटर श्रीमती आनंदी धांगडा, श्री वसंत कुंवरा त्याच बरोबर कल्याण कृषी विभागातील कृषी सहायक दीपिका बांडे व कारुण्य संस्थेतील ग्रामीण प्रकल्प इंचार्ज ज्युली कलमकर व जीवन प्रकल्प समन्वयक किरण वाघमारे उपस्थित होते. सदर अळंबी लागवड प्रशिक्षणासाठी विविध गावांतून ११९ महीला शेतकरी उपस्थित होत्या. उपस्थितीत मान्यवर कृषी सहाय्यक दीपिका मॅडम यांनी कृषी योजनांबद्दल महिलांना मार्गदर्शन केले. त्यानंतर अळंबी लागवडीचे प्रात्यक्षिक करून महिलांना सुरुवात ते शेवट प्रक्रिया समजवून देण्यात आली. त्यामध्ये भाताचा पेंडा व बीज कश्या प्रकारे स्वच्छता राखून थर पिशव्यांमध्ये रचायचे आणि कसे टांगायचे. सर्व प्रक्रिया प्रात्यक्षिक दाखवून करण्यात आली. या मध्ये विशेष मार्गदर्शन हे श्रीमती शेवंती राऊत, श्रीमती कल्पना राऊत, सुवर्णा राऊत आणि मीना चौधरी या वसई जनहित ट्रस्ट च्या लाभार्थी महिलांनी केली. कारण याच महिलांनी त्यांच्या प्रकल्प क्षेत्रात अळंबीची यशस्वी लागवड करुन विक्री करुन आता ते मार्गदर्शक म्हणून देखील कार्यरत आहेत. शेवटी महिलांचा उत्साह पाहून महिलांना कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड इथून आणलेले अळंबी चे बियाणे वाटप करुन त्यांना शिकून रोजगारात हातभार लागावा यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. महिलांना घरी बसल्या शेतकी उद्‌योगातून रोजगार मिळावा या उद्देशातून हा शेतीचा अदान प्रदान कार्यक्रम राबवण्यात आला. आम्ही देखील आमच्या गावामध्ये ही लागवड यशस्वी रित्या करू असे वचन महिलांकडून देण्यात आले आणि या कार्यक्रमाची सांगता झाली.

# अमंली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

कल्याणच्या खडकपाडा पोलीस स्टेशन हद्दीत आंबिवली येथील जाफर मनोज इराणी हा इसम गांधारी ब्रिज या ठिकाणी संशयस्पद आढळून आल्याने त्याच्या अंगझडती दरम्याने 10 ग्राम वजनाचा अंदाजे 31 हजार रुपये किमतीचा मेफाड्रोन (एमडी) हा पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतः जवळ बाळगला असल्याचे मिळून आला. हि कारवाई पोनि शिवले, सपोनि गायकवाड, पोउपनि चव्हाण, पोलीस नाईक कसबे, पोलीस हवालदार जाधव, सोनवणे यांच्या पथकाने केली आहे. तर कल्याण परिमंडळ-3 मधील विविध पोलीसस्टेशन अंतर्गत मोकळी मैदानी, निर्जनस्थळे व रोडवरील आस्थापना यांच्यावर पोलिसांतर्फे धडक कारवाई सुरू असून शनिवार रविवार रात्री विहित वेळेपेक्षा सुरू असलेल्या आस्थापनावर एकूण 73 कारवाई तसेच उघड्यावर व निर्जस्थळी नशेखोरांवर एकूण 168 कारवाई करण्यात आली. अशा एकुण 241 कारवाई करण्यात आल्या आहे. तसेच रोडवरील अती वेगाने मोटार सायकल चालवणे आणि ट्रिपल सीट वाहन चालवणे 269 करवाई अशा प्रकारे एकूण 510 कारवाई करण्यात आली असून पोलिसांची अशीच धडक कारवाई मोहिम यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

# बैलांची झुंज लावल्याप्रकरणी गुन्हा दाखल

## मानपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

न्यायालयाची बंदी असताना देखील डोंबिवली सोनारपाडा गावात बैलांची झुंज पार पडली. बैलांची हि झुंज बघण्यासाठी नागरिकांनी तोबा गर्दी केली होती. तर सोशल मिडियावर या झुंजीचा व्हीडीओ वायरल झाल्यानंतर बैलांची झुंज लावल्याप्रकरणी मानपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोनारपाडा गावात दोन बैलांची झुंज आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत अंबरनाथ तालुक्यातील काकडवाल आणि कल्याणच्या सापाड गावचे बैल सहभागी झाले होते. स्पर्धेत बैलांची सुरू असलेली झुंज प्रेक्षक पाहत असताना त्यांच्यासमोर तरुणाई धिंगाणा घालताना मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाले असून हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यापूर्वी सुद्धा अश्या स्पर्धामध्ये दोन गटात भांडण आणि राडे झाले आहेत. त्यामुळे या स्पर्धेत असा प्रकार घडला असता तर याला जबाबदार कोण, असा सवाल उपस्थिती केला जात आहे.

तर या प्रकरणाची पोलिसांना माहिती मिळताच मानपाडा पोलीसांनी अंबरनाथ तालुक्यातील काकडवाल गावातील झुंज बैल मालक रोशन दळवी, गणेश साळवी व कल्याण मधील सापाड गावातील बारक्या मढवी व आयोजक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती मानपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी दिली.

# सुभाष मैदान इनडोअर गेमचे काम मनसैनिकांनी केले बंद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

कल्याण मधील सुभाष मैदानात होत असलेल्या इनडोअर गेमसाठीच्या हॉलला याआधीच मनसेने आणि क्रीडा प्रेमींनी विरोध केला होता. आज याठिकाणी मैदानावर या इनडोअर गेमच्या हॉलसाठीचे काम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून सुरू करण्यात आले असता मनसे कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमींनी गोंधळ घालत केडीएमसीचे काम बंद पाडलं. महापालिकेने इतर ठिकाणी हे इनडोअर हॉल बनवावा, या मैदानाचा बळी घेतल्यास अधिकाऱ्यांचा बळी घेणार असा इशारा मनसेच्या वतीने यावेळी देण्यात आला.

यावेळी मनसेचे माजी आमदार प्रकाश भोईर, जिल्हा अध्यक्ष उल्हास भोईर, चेतना रामचंद्र, अनिता प्रसाद, कपिल पवार, रोहन पोवार, संदीप पंडित, गणेश लांडगे, कैलास पनवेलकर, योगेश शाह, आश्विन कुलकर्णी, क्रिकेटप्रेमी समीर खान आदींसह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.जे मैदान आहे ते मैदान राहिले पाहिजे, मैदानाच्या नूतणीकरणाला विरोध नसून मैदान गिळंकृत करण्याला विरोध आहे. हाच प्रकल्प डोंबिवलीतील भागशाळा मैदान येथे गेला होता मात्र तिथे विरोध झाल्याने कल्याणमध्ये हा प्रकल्प लादत आहेत. हे होत असतांना मात्र याला लोकप्रतिनिधी विरोध करत नाहीत हे आश्चर्य असल्याचे माजी आमदार प्रकाश भोईर यांनी सांगितले.

केडीएमसीच्या आधिकाऱ्यांचा निषेध करत असून, मातीचे खेळ बंद करून इनडोअर गेम सुरू करण्याचा या अधिकाऱ्यांचा घाट असून जर सुभाष मैदानाचा बळी घेण्याचा प्रयत्न केला तर अधिकाऱ्यांचा बळी घेतल्याशिवाय राहणार नाही असा तीव्र इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी यावेळी दिला.

सुभाष मैदान हे एतीहासीक मैदान असून याठिकाणी सचिन तेंडूलकर, विनोद कांबळी, संजय मांजरेकर, तुषार देशपांडे यासारखे खेळाडू या मैदानात खेळले आहेत. सध्या मुलं मोबाइलमध्ये गुंतल्याने त्यांचे डोळे खराब झाले आहेत. त्यामुळे मैदानी खेळांची आवश्यकता असून यासाठी हे मैदान अबाधित राखणे गरजेचे आहे. सर्व क्रीडा प्रेमी या इनडोअर हॉल लं विरोध करत असून यासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा क्रिकेटप्रेमी समीर खान यांनी दिला आहे.

तर याबाबत केडीएमसीचे कार्यकारी अभियंता जगदीश कोरे यांना विचारले असता, सुभाष मैदान येथे खेलो इंडिया या केंद्र शासनाच्या निधीतून इनडोअर हॉल बांधण्यात येत आहे. साडेसात कोटी निधी मंजूर झाला आहे. या कामाला आज सुरवात करण्यात आली होती. क्रिकेटसाठी मैदान सोडून हा हॉल बांधण्यात येत असून नागरिकांची समजूत काढून हे काम सुरू करणार असल्याचे कोरे यांनी सांगितले.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी